**CNR :- MHSI100003092018**

**–: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८ :–**

**–: निशाणी ७१ वरील आदेश :–**

वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ९ चे कायदेशीर वारसांना दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये दुरुस्ती करुन सामील करणेस परवानगी मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ९ – गणपत बाळा ठाकूर हे दि. २३.०४.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र. ९ चे वारस खालीलप्रमाणे आहेत.

प्रतिवादी क्र. ९–अ) रंजना गणपत ठाकूर, (मयत प्रतिवादी क्र. ९ ची पत्नी)
वय सु. ७० वर्षे, धंदा – गृहिणी,
प्रतिवादी क्र. ९–ब) महेश गणपत ठाकूर, (मयत प्रतिवादी क्र. ९ चा मुलगा)
वय सु. ४६ वर्षे, धंदा – शेती,
प्रतिवादी क्र. ९–क) निलेश गणपत ठाकूर, (मयत प्रतिवादी क्र. ९ चा मुलगा)
वय सु. ४४ वर्षे, धंदा – शेती,
प्रतिवादी क्र. ९–अ) ते ९–क) सर्व
रा. हेवाळे, बाबरवाडी,
ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग.

वरील प्रमाणे प्रतिवादी क्र. ९ यास वारस असून त्यास अन्य कोणीही जवळचे कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ९ च्या समोर मयत

असे लिहून त्यांच्या खाली त्यांचे वारस म्हणुन दाव्यात सामील करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज वादीने केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादी क्र. ९ चे वारसांतर्फे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र. ९अ यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास तीव्र विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी क्र. ९अ चे म्हणण्यानुसार त्यांनी नि.क्र. ६९ व ७० वरील अर्जास आक्षेप नोंदविलेला असल्याने, सदरचा अर्ज विलंबाच्या कारणास्तव नामंजूर करण्याबाबत विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. ९क याने, प्रतिवादी क्र. ९अ चे म्हणणे स्वीकृत करत असलेबाबतची पुरशीस नि.क्र. ७७ वर दाखल केलेली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रतिवादी क्र. ०९ हे दि.२३.०४.२०२१ रोजी मयत झालेले असून त्यास कायदेशीर वारस खालीलप्रमाणे असल्याचे दिसून येतात.

**प्रतिवादी क्र.९–अ) रंजना गणपत ठाकूर, (मयत प्रतिवादी क्र. ९ ची पत्नी)**
**वय सु. ७० वर्षे, धंदा – गृहिणी,**
**प्रतिवादी क्र.९–ब) महेश गणपत ठाकूर, (मयत प्रतिवादी क्र. ९ चा मुलगा)**
**वय सु. ४६ वर्षे, धंदा – शेती,**
**प्रतिवादी क्र.९–क) निलेश गणपत ठाकूर, (मयत प्रतिवादी क्र. ९ चा मुलगा)**
**वय सु. ४४ वर्षे, धंदा – शेती,**
**प्रतिवादी क्र. ९–अ) ते ९–क) सर्व**
**रा. हेवाळे, बाबरवाडी,**
**ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग.**

०६. दाव्याचे स्वरुप पाहता मयत प्रतिवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ९ चे वारसांनी अर्जास आक्षेप नोंदविला आहे. परंतु त्यांनी अर्जाच्या अनुषंगाने दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करता त्यांनी कुठेही प्रतिवादी क्र. ९ चे वारस असल्याचे नाकारलेले नाही. प्रतिवादी क्र. ९ यांचे वारस अभिलेखावर आणण्यास विलंब केलेला आहे. विलंबाचे दिलेले कारण संयुक्तीक व समाधानकारक नाही. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादी क्र. १ व ३ चे वारस अभिलेखावर सादर करण्याची उचित संधी नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरोधी होणार आहे. अर्ज नामंजूर केल्यास अर्जाच्या अनुषंगाने करावी लागणारी विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी झालेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करणे मला उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. न्यायाचे कारणे रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी ७१ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय सदर खर्चाची रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) भरुन; प्रतिवादी क्र. ९ चे वारसांना प्रस्तुत अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात समाविष्ट केल्यावर तशी दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. सदरची खर्चाची रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे मात्र) मोफत विधीसेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करणेत यावी.

Digitally signed by YASHODHAN PRADIP BAVKAR
Date: 2023.02.08 10:59:23 +0530

ठिकाण – दोडामार्ग.

दिनांक – ०७.०२.२०२३

(वाय. पी. बांवकर)
दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
दोडामार्ग.